# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

### ५०) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २३ सप्टेंबर २०२२

| मागील आठवड्यातील हवामान (१६/०९/२०२२ ते २२/०९/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/०९/२०२२ ते २८/०९/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | दिनांक | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| १४ | ०.५ | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ११ | ६ | ९ | १२ | ९ |
| २८.६ | २९.५ | ३२.१ | २७.७ | ३१.१ | ३१.५ | ३०.८ | कमाल तापमान (अं.से.) | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ |
| २४.६ | २४.६ | २५ | २५.५ | २५.२ | २५.७ | २५.४ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २४ | २५ | २५ |
| ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | स्वच्छ | स्वच्छ | अंशतः ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| १०० | ९६ | ९८ | ९६ | ९९ | ९४ | ९१ | स. सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ९२ | ९० | ९१ | ९२ |
| ८६ | ७८ | ५६ | ८६ | ६७ | ६१ | ६१ | दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ७६ | ६७ | ६६ | ६३ |
| ११ | ६ | ६ | ११ | १० | १६ | १५ | हवेचा वेग (किमी/तास) | १९ | १५ | १४ | १५ | १५ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, पुढील पाच दिवसात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २९ ते ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ ते २५ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
|---|---|---|
| विस्तारित हवामान अंदाज | | दि. २८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२२ दरम्यान मध्य महाराष्ट्रात पाऊस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
| सामान्य सल्ला | | शेतकरी बांधवांनी हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी “मेघदुत” आणि विज पडण्याची पूर्वसूचना मिळवण्यासाठी “दामिनी” मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | जिल्ह्यात पुढील पाच दिवसात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| कापूस | पाते लागणे ते फुलोरा | कापूस पिकात पावसामुळे होणारी पात्या, फुले यांची गळ कमी करण्यासाठी नॅप्थॅलिन ॲसेटिक ॲसीड (प्लॅनोफिक्स) या संजीवकाची हेक्टरी १०० मि.लि. ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून पात्या लागल्या असतील तेव्हा हवामान कोरडे असताना पहिली फवारणी करावी. दुसरी फवारणी त्यानंतर १५ ते २० दिवसांनी करावी. |
| सोयाबीन | फुलोरा अवस्था | पिकात पाने खाणाऱ्या उंट अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस ५० ईसी २० मिली किंवा क्लोरॅनट्रॉनिलीप्रोल १८.५ एससी ३ मिली किंवा डेकोमेथ्रीन २.८ % प्रवाही १० मिली किंवा ईडोक्झाकार्ब १५.८ एसी ६.६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून हवामान कोरडे असताना फवारणी करावी. |
| मुग व उडीद | काढणी | पक्वता अवस्थेत असलेल्या मुग आणि उडीद पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| तुर | फांद्या वाढीची अवस्था | पावसामुळे तुरीची खालची पाने पिवळी पडली असल्यास नत्राची कमतरता लक्षात घेऊन दोन टक्के युरियाची किंवा डीएपीची (२ किलो प्रति १०० लिटर पाणी) फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी. फवारणी शक्य नसल्यास निंबोळी पेंड ५० किलो व युरिया २० किलो प्रति एकरी कोळपणी देण्यापूर्वी वापरावे. |
| मका | कणसात दाणे भरण्याची अवस्था | पिकात अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास अंडीपुंज गोळा करुन नष्ट करावेत. किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच पोंग्यामध्ये वाळू टाकावी. असे केल्याने अळीला वाढीच्या भागातील खाण्यापासून परावृत्त करता येईल व शेंडा तुटणार नाही. अळी वाढीच्या (१ ते ३ अवस्थांमध्ये) निमअर्क १५०० पीपीएम किंवा निंबोळी अर्क ५% यांची ५ मिली अथवा थायमेथोक्झाम १२.६% + लॅम्डासायहेलोथ्रीन ९.५% झेडसी मिश्रकीटकनाशकाची ०.५ मिली/लिटर पाणी याप्रमाणात फवारणी हवामान कोरडे असताना करावी. |
| कांदा | लागवड | पावसामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात टाकून आवळणी पावसाची उघडीप पाहून करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | पावसामुळे केळीची पाने पिवळी पडली असल्यास पाण्याचा निचरा केल्यानंतर कार्बेन्डाझिम (५० डब्ल्यूपी) २ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ ईसी) २ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून या द्रावणाची झाडाच्या बुडालगत आळवणी करावी. |
| पशुसंवर्धन | लम्पी स्कीन रोग | **कारणे:** रोगाचा संसर्ग "कॅप्रीपॉक्स" विषाणूमुळे होतो. हा शेळ्या व मेंढ्यांमधील देवी रोगाच्या विषाणूशी संबंधित आहे.<br>**पशुपालकांनी घ्यावयाची काळजी:** बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवणे. कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेश करू देऊ नये. डास, गोचिड व तत्सम किड्यांच्या बंदोबस्त करणे. निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावणे व गोठ्यामध्ये औषधी फवाराव्यात. रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंध करणे.<br>**प्रतिबंधात्मक उपाययोजना:** तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत. त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार औषध मलम लावावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे. |
| गृहविज्ञान | पोषणबागेचे नियोजन | रब्बी हंगामात पोषण बागेचे नियोजन करताना लागवडीसाठी कंदवर्गीय, पालेवर्गीय, फळवर्गीय भाज्यांची निवड करावी. कंदवर्गीय भाज्यांमध्ये (मुळा, गाजर, बीट), पालेवर्गीय भाज्यांमध्ये (आंबट चुका, पालक, मेथी, शेपू, पोकळा) आणि फळवर्गीय भाज्यांमध्ये (वांगे, मिरची, टोमॅटो, वाटाणा, भेंडी, ढेमसा) या विविध प्रकारच्या भाज्यांची निवड करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


**स्त्रोत**

१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग , प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई .

२) मागील हवामान : स्वयंचलित कृषिहवामान केंद्र, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

दि. : २३/०९/२०२२

स्वाक्षरीत

प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार